# महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

## प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,

## अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 07 | एकुण गुण- 100 |
| विषय | - सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था | वेळ - 1000 ते 1300 |
| दिनांक | - 15/01/2015 | वार - गुरुवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :
- अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
- ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
- क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
- ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
- इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
- ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
- उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
- ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

गुण

**प्र.1** अंबड येथील 2000 कर्मचारी संख्या असलेल्या एका कारखान्याच्या प्रशासनाने कंपनीतील 12 कामगारांना गैरवर्तनाबद्दल कामावरुन काढून टाकले आहे. कामगारांवर दबाव टाकण्यासाठी व कामगारांच्या विविध मागण्या अमान्य करण्यासाठी कंपनीच्या प्रशासनाने ही कारवाई केली असे कामगार संघटनेचे म्हणने आहे. संघटनेचे सदस्य असलेले कामगार कंपनीच्या दरवाजावर धरणे आंदोलन करणार आहेत व जर संघटनेत सहभागी नसलेले कामगार कामावर आले तर त्यांना कंपनीत कामावर जाण्यास अटकाव करणार आहेत. **15**

कामगारांचा एक गट त्याचवेळी कामगार आयुक्तांच्या कार्यालयात जाऊन त्यांना निवेदन देणार आहे.

**या कंपनीतील कामगारांचे आंदोलन पोलीसांनी कसे हाताळावे ते स्पष्ट करा. आवश्यक तेथे कायदेशीर तरतूदी नमूद करा.**

**प्र.2** संबलपूर गावामध्ये एका देवस्थानाची मोठया प्रमाणावर जत्रा भरते व हजारो नागरीक जत्रेला येतात. जत्रेच्या ठिकाणी अरुंद रस्त्यावर दाटीवाटीने उभारलेल्या तात्पुरत्या दुकानांपैकी एका दुकानाला आग लागून ती आग इतरत्र पसरली व चेंगराचेंगरी होऊन 25 भाविक मृत्युमुखी पडले. **15**

**सदर घटनेबाबत पोलीसांची प्राथमिक जबाबदारी कोणती? ते सांगून पोलीसांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये याबाबत विस्तृत लिहा.**

**प्र.3** अंतर्गत सुरक्षा म्हणजे काय? अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न कोणत्या परिस्थितीत उद्भवतो? **15**
अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी नियमीतपणे काय उपाययोजना केली पाहीजे व अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर कोणती उपाययोजना केली पाहीजे?

**प्र.4** निवडणुकीच्या कालावधीत जागांची उपलब्धता नसल्यामुळे दोन रस्त्यांच्या मध्ये असलेल्या एका शंकुच्या/ त्रिकोणी आकाराच्या जागेत एका अतिमहत्वाच्या उच्च सुरक्षा व्यवस्था असणाऱ्या व्यक्तीची सभा आयोजीत करण्यात आलेली आहे. अशा मर्यादीत जागेवरील ठिकाणच्या सभेच्या बंदोबस्ताची व्यवस्था आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करुन सभा ठिकाणची तपासणी तीन भागात कशा पध्दतीने करावी ते सविस्तर स्पष्ट करा. **15**

**प्र.5** **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. [प्रत्येकी 200 शब्द] [प्रत्येकी 08 गुण]** **40**

अ. सडक सुरक्षा अभियानाचे महत्व सांगून सडक सुरक्षा साध्य होण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषद करा.

ब. भारतात अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत गुप्तवार्ता कोणकोणत्या पातळीवर हाताळल्या जातात ते सांगून गुप्तवार्तेचे प्रकार सांगा.

क. नक्षलवाद्यांना सहानुभूती मिळण्याची कारणे सांगून सहानुभूती मिळविण्यासाठी नक्षलवाद्यांकडून केले जाणारे प्रयत्न थोडक्यात सांगा.

ड. वैयक्तिक सुरक्षा अधिकाऱ्याची अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या सुरक्षेबाबतची कर्तव्ये स्पष्ट करा.

इ. दहशतवादास प्रतिबंध करावयासाठीच्या पोलीसांच्या उपाययोजना व प्रतिसाद.

***